# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## " भोगवटा प्रमाणपत्र "

## OCCUPANCY CERTIFICAT

जा.क्र.नांवाशमनपा/नरवि/ 1244
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दिनांक : 16/3/2022
संदर्भ : 1) अर्जदार यांचा अर्ज दि. 23/08/2021.
2) R/MISC/1221/3419 दि.29/12/2021 आपला अर्ज दि.28/2/2022

भोगवटा प्रमाणपत्र धारणकरणा-याचे **नाव 1. श्री. बलभिम विश्वनाथराव रेणापुरकर व इतर रा. मौजे. तरोडा खु, नांदेड.**

प्रमाणित करण्यात येते की, **भुखंड क्र. 40 ते 47 Building no 1 गट क्र. 87 व 90 मौजे. तरोडा खु, नांदेड.** मिळकती वर रहीवास कारणास्तव तळघर (पार्कींग साठी)**तळमजला, पहिलामजला**,दुसरामजला,तिसरामजला, साठी बांधकाम परवानगी संचिका क्रमांक SOC/46/17/19-20 दि.14/08/2019 अन्वये बांधकाम परवानगी क्र. 200/20 दिनांक 24/01/2020 नुसार परवाना धारक श्री. मनोज दत्तात्रय देशपांडे, परवाना धारक अभियंता यांच्या देखरेखीत सदर इमारतीचे बांधकाम झालेले आहे. **Plinth Level चे प्रमाणपत्र क्रं.468 दि.09/10/2020** नुसार घेतलेले आहे. तसेच प्रत्यक्ष बांधकाम करतेवेळी केलेल्या फेर बदलापैकी नकाशामध्ये दर्शविलेल्या नुसार चे बदल हे नियमानुसार असल्याने त्यास मान्यता देण्यात येत असुन त्यानी सादर केलेल्या पुर्णतः प्रमाणपत्राच्या आधारे सदर बांधकाम झालेल्या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र खालिल प्रमाणे/ अटीवर देण्यात येते.

सदरील भुखंडाच्या हद्दी व चतु:सिमा बाबत वाद उत्पन्न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मिळकत धारका / विकाससक आणि अर्जदार तथा वास्तुविशारद स्ट्रक्चरल इंजिनिअर यांची राहील.

1. सदर भोगवटा प्रमाणपत्र इमारतीचे मर्यादे पर्यतचे आहे. इमारतीचे स्थानांकन, भुखंडाचे क्षेत्र, हद्दी चतु:सिमा इत्यादी बाबत वाद निर्माण झाल्यास तसेच विकास योजने नुसार भखंडाचे स्थाना बाबत भविष्यात वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदारवर राहील. त्याकरिता महानगरपालिकेची जबाबदारी राहरणार नाही.
2. सदरच्या भोगवटा प्रमाणपत्रा व्यतीरीक्त भविष्यात प्रत्येक्ष जागेवर अतिरिक्त बांधकाम आढळल्यास ते अनाधिकृत विनापरवानगी समजुन त्यावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
3. बांधकाम परवानगी पत्र क्रं. **200/20 दि. 24/01/2020** मध्ये नमुद केलेल्या अटी व करारनामा मधील नमुद अटी अर्जदारावर बंधनकारक राहील.
4. विकासकावर विकसीत इमारतीचे बाबत इतर कायद्यानुसार असलेल्या तरतुदी प्रमाणे सर्व बाबीची पुर्तता करण्याची जबाबदारी राहील.
5. सोबतच्या नकाशा प्रमाणे **तळघर** (पार्कींग साठी)**तळमजला,पहिलामजला,दुसरामजला,तिसरामजला** रहीवास कारणास्तव साठी एकुण बांधकाम क्षेत्र **1848.32 Building no 1** चौ.मी. करिता भोगवटा प्रमाणपत्र अटी व शर्तीवर देण्यात येत असुन चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय) च्या प्रमाणाबाहेर जाता येणार नाही.
6. विमानतळ प्राधिकरण यांचे कडील नाहरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.
7. शासन/महानगरपालिका/ मा. उच्च न्यायालया कडुन होणारे निर्णय बंधनकारक राहतील. व कोणतीही नुकसान भरपाई मिळणार नाही.
8. UDCPR मधिल नियमानुसार जागेवर रस्ते, पाण्याचा निचरा होण्याच्या नाली, पाणि पुरवठा वाहिणी, ड्रेनेज लाईन, इलेक्ट्रीकल लाईन इत्यादी कामे झाल्यानंतरच गाळे हास्तांतर करावे.
9. Fire act च्या आवश्यकतेनुसार अग्निशमन विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय गाळे हास्तांतर करु नये.
10. विकास नियंत्रण व प्रोत्साहान नियमानुसार सर्व नियम व मनपाने वेळोवेळी दिलेले निर्देश पाळणे बंधनकारक राहील.
11. आपण लेखी साद केल्यानुसार व नकाशात दर्शविल्यानुसार पार्किंग तसेच डिमार्केटेड पार्किंग चा वापर वाहनतळासाठीच करणे बंधनकारक राहील.
12. अग्नीशमन विभाग यांचे क्र./नावाशमनपा/अवअसे/1327/22 दि.21/02/2022 मधिल अटी चे पालन करणे बंधनकारक राहील.

**(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)**

सहाय्यक संचालक नगररचना
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रत :-

1. मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांना माहितीस्तव सादर.
2. सहाय्यक आयुक्त, क्षेत्रिय कार्यालय क्र. 1. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
3. अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना माहिती व कार्यवाहीस्तव